धर्मादाय आयुक्त यांचे कार्यालय
तिसरा मजला, ८३, डॉ.ॲनी बेझंट रो
वरळी, मुंबई -४०००१८.
दिनांक : २६.१०.२०१५

**परिपत्रक क्रमांक** 437 **दिनांक** 26/10/2015

**संदर्भ : या कार्यालयाचे परिपत्रक क्र.४३५ दिनांक २१.०९.२०१५**

आपल्याकडे विभागणी केलेल्या सार्वजनिक न्यासाद्वारे चालविण्यात येणाऱ्या धर्मादाय रुग्णालय तसेच धर्मादाय वैद्यकीय केंद्र यांचेकडून या कार्यालयाच्या ई-गर्व्हनंन्स (E-governance) कार्यक्रमांतर्ग राखीव खाटांची माहिती वगैरे रीअल टाईम (Reatl Time Basis) वर व इतर अनुषंगिक माहिती वेळोवेळ संकेतस्थळावर उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्याबाबतचे नमुना पत्र सोबत जोडले आहे.

तरी, सदर परिपत्रकाद्वारे असे आदेश देण्यात येतात की, बृहन्मुंबई येथील धर्मादाय उप आयुक्त व सर्व सहायक धर्मादाय आयुक्त यांचे अधिपत्याखालील सर्व धर्मादाय रुग्णालय व धर्मादाय वैद्यकीय केंद्रांचे वेळोवेळी सखोल निरीक्षण घेण्यात यावे. तसेच, उपरोक्त माहिती संबंधित धर्मादाय रुग्ण व धर्मादाय वैद्यकीय केंद्र यांचेकडून वेळोवेळी उपलब्ध होते किंवा कसे तसेच सदरहू माहिती कशा प्रकारे उपलब्ध होत आहे, याबाबत वेळोवेळी आढावा घेण्यात यावा व जे धर्मादाय रुग्णालय अशी माहिती पुरवत नाही, त्यांचेवर उचित कार्यवाही करावी आणि त्याबाबतचा एकत्रित अहवाल प्रत्येक महिन्याच्या एक तारखेस श्री.सु.पु.कुलकर्णी, धर्मादाय सह आयुक्त-१, मुख्यालय यांना विनाविलंब सादर करावा.

(श.भा.सावळे)
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत :

१. धर्मादाय सह आयुक्त-१ व २, मुख्यालय.
२. धर्मादाय सह आयुक्त, बृहन्मुंबई
३. धर्मादाय उप आयुक्त, बृहन्मुंबई
४. सहायक धर्मादाय आयुक्त, मुख्यालय
५. सर्व सहायक धर्मादाय आयुक्त, बृहन्मुंबई.